६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
७. संचालक, मित्रा, नाशिक.
८. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर नवी मुंबई.
९. संचालक, भाभा ऑटोमीक रिसर्च सेंटर, मुंबई.
१०. गोपुरी आश्रम,मु.पो.वागदे,गोपूरी,ता.कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग.
११. अवर सचिव पापु-२५, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर नवी मुंबई.
१२. संग्रहार्थ.

गोबरधन कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

**शासन निर्णय क्रमांकः** स्वभामि २०१८/प्र.क्र.३६७/पापु-१६
७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
तारीख: १९ सप्टेंबर,२०१८.

वाचा :-

**१) केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचना एप्रिल, २०१८.**
**२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय समक्रमांक दिनांक २८ ऑगस्ट, २०१८.**

**प्रस्तावना :-**

उपरोक्त वाचा क्रमांक १ अन्वये केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता मंत्रालयाने गोबरधन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सर्वसाधारण सूचना निर्गमित केल्या आहेत. गोबरधन कार्यक्रमाची यशस्वीरित्या प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती (State Technical Advisory Committee-STAC) गठीत करण्यातसंदर्भात, मार्गदर्शक सूचना मधील Role of State अन्वये निर्देशित केले आहे. त्यास अनुसरून महाराष्ट्र राज्यामध्ये गोबरधन कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी, ग्रामपंचायतीने राबवावयाच्या प्रस्तावांना सहाय्य करण्यासाठी तांत्रिक यंत्रणेची (Technical Agency) निवड करणे, तांत्रिक यंत्रणेने (Technical Agency) तयार केलेल्या व सादर केलेल्या प्रस्तावांना मान्यता देणे या व इतर बाबींकरिता वाचा क्रमांक २ अन्वये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती (State Technical Advisory Committee-STAC) गठीत करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील शेवटच्या परिच्छेदात जिल्हा पाणी व स्वच्छता कक्षाची भूमिका येथे गोबरधन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा पाणी व स्वच्छता कक्षाने (DWSC) संबंधित जिल्हयांच्या प्रस्तावांना मान्यता देणे व संनियंत्रण करणे यासाठी समन्वय समितीने Nodal Agency म्हणून काम करावयाचे आहे, असे नमूद केले आहे. त्याऐवजी गोबरधन कार्यक्रमातंर्गत स्वतंत्र जिल्हास्तरीय समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र राज्यामध्ये गोबरधन कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे:-

| क्र. | अधिकारी पदनाम | पदनाम |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २ | पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३ | कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४ | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा,जिल्हा परिषद | सदस्य |
| ५ | अभियांत्रिकी तज्ञ, जिल्हा परिषद | सदस्य |

| क्र. | अधिकारी पदनाम | पदनाम |
|---|---|---|
| ६ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता,जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :-**

गोबरधन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील उपरोक्त जिल्हास्तरीय समितीने संबंधित जिल्हयांच्या प्रस्तावांना मान्यता देणे व संनियंत्रण करणे यासाठी समन्वय समिती Nodal Agency म्हणून काम करावयाचे आहे.

जिल्हयांच्या प्रस्तावांना मान्यता देताना पुढील बाबींची तपासणी करण्यात यावी. :- १) प्रस्ताव मंजूरीबाबत ग्राम सभेच्या ठराव आवश्यक आहे. २) गोबरधन कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीने जागा उपलब्धतेबाबत संमतीपत्र देणे आवश्यक आहे. ३) प्रस्ताव केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विहित नमुन्यात सादर केलेला असावा. ४) केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या कमाल रक्कमेपेक्षा अधिकचा खर्च संबंधित ग्रामपंचायत करणार असल्याबाबत ग्राम पंचायतीचे संमतीपत्र घेणे आवश्यक आहे. ५) प्रस्तावाची तपासणी करताना आवश्यकतेनुसार संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, गटविकास अधिकारी यांना बैठकांसाठी निमंत्रित करण्यात यावे.

**समितीची मुदत:-**

उपरोक्त समिती दोन वर्षाकरीता कार्यरत राहील. यासंदर्भातील खर्च स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या योजनेंतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०९१९१५२६२२६३२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Chandrakant Krishna More

Digitally signed by Chandrakant Krishna More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea4271090267228122b638d6f2cdedad62, serialNumber=2314cf333e070f9936792bc95890fa89b2f617a931b2b577b703fa858f3df433, cn=Chandrakant Krishna More
Date: 2018.09.19 16:39:27 +05'30'

**(चं. कृ. मोरे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.
३. सचिव, पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई.
५. उप सचिव तथा प्रकल्प अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
७. संचालक, मित्रा, नाशिक.
८. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर नवी मुंबई.
९. संचालक, भाभा ॲटोमीक रिसर्च सेंटर, मुंबई.
१०.गोपुरी आश्रम,मु.पो.वागदे,गोपूरी,ता.कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग.
११.अवर सचिव पापु-२५, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर नवी मुंबई.
१२.संग्रहार्थ.

कार्यालयीन स्वच्छता पंधरवडा
साजरा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : स्वभामि-२०१८/प्र.क्र. ५१५/पापु-१६
७ वा मजला, जी.टी रुग्णालय संकुल,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
दिनांक : ०६ ऑक्टोबर, २०१८.

**वाचा :-१) शासन परिपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.मंमंटि/२०१०/प्र.क्र.५०/ प्रशासन -४, दिनांक ३ मार्च, २०१०.**

**२) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.एसबीएम-२०१५/ २५८/प्र.क्र.११५/पापु-०८, दिनांक १७/०७/२०१५**

**शासन परिपत्रक**

मा. पंतप्रधान श्री. नरेद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुरु असलेल्या **" स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) "** या राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होऊन दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी महाराष्ट्र राज्य हागणदारीमुक्त म्हणून घोषित केले आहे. सर्वत्र स्वच्छता , सफाई रहावी व राज्य हागणदारीमुक्त रहावे, याकरीता भारत सरकार, तसेच महाराष्ट्र शासनातर्फे विविध कार्यक्रम / अभियान आयोजित करण्यात येत आहेत. या कार्यक्रमांमध्ये **"स्वच्छता ही सेवा"**, कार्यक्रम प्रामुख्याने राबविला जात आहे. यामध्ये राज्याने भरीव कामगिरी करुन राष्ट्रीय स्तरावरील **"स्वच्छता ही सेवा २०१७"** या मोहिमेत राज्याला प्रथम पारितोषिकाचा मान प्राप्त झाला आहे. सद्य:स्थितीत राज्यातील स्वच्छता शाश्वत रहावी या अनुषंगाने उपाययोजना करणे सुरु आहे. या उपाययोजनांचा एक भाग म्हणून राज्याच्या ग्रामीण भागातील सर्व अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उप आरोग्य केंद्र, रेल्वे स्टेशन, बस डेपो, सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये व इतर सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता रहावी, याकरीता **"स्वच्छता ही सेवा "** या दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ ते दिनांक २ ऑक्टोबर, २०१८ दरम्यान राबविलेल्या स्वच्छता अभियानात या ठिकाणांना भेटी देऊन, तसेच श्रमदान करुन या ठिकाणांची स्वच्छता करण्याचे उपक्रम राबविण्यात आले आहेत. दिनांक ३.१०.२०१८ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत राज्याच्या स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण-२०१८ तील यशावर चर्चा होऊन मा.मुख्यमंत्री यांनी शासकीय कार्यालये व निमशासकीय कार्यालयांत कायम स्वच्छता राहावी व तेथे आनंदी वातावरण राहावे, या अनुषंगाने राज्यात "स्वच्छता पंधरवडा" राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. या अनुषंगाने आता सर्व शासकिय तसेच निमशासकीय कार्यालयात दिनांक १३.१०.२०१८ पासून ते दिनांक २८.१०.२०१८ पर्यंत स्वच्छता पंधरवडा राबविण्याच्या सूचना या परिपत्रकाद्वारे निर्गमित करण्यात येत आहेत. स्वच्छता पंधरवडा राबविताना खालील सूचना विचारात घेऊन कार्यवाही करण्यात यावी :-

अ) सूचना:-

१. मंत्रालयीन तसेच प्रत्येक (शहरी व ग्रामीण) शासकीय व निमशासकीय कार्यालयातील कार्यालयीन जागा ही नीटनेटकी व सुटसुटीत ठेवण्यात यावी. कार्यालयातील छन्नमार्ग (पॅसेज) तसेच पायऱ्यांवर स्वच्छता राखून सदर मार्गात कोणतीही कार्यालयीन वस्तू/

दस्तऐवज ठेवू नये. तसेच कार्यालयातील जागेत पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी नस्ती/ऑफीस फाईल्स /कागदपत्रे इत्यादी सुयोग्य पध्दतीने ठेवण्यात यावीत.

२. कार्यालयातील पंखे, खुर्च्या, टेबल, कपाटे (Racks), यांसारखी साधने, तसेच कार्यालय परिसर, स्वच्छतागृहे, उदवाहन ( लिफ्ट), इत्यादी ठिकाणची जागा नेहमीच स्वच्छ व टापटीप राहील याची दक्षता घेण्यात यावी. त्याचबरोबर कार्यालयाच्या लगतच्या बाहेरील जागा उदा. पार्किंग लॉट्स, कार्यालयातील येण्या-जाण्याचा मार्ग इत्यादी ठिकाणी देखील नियमित स्वच्छता राखण्यात यावी.

३. कार्यालयात येण्याचा मार्ग व कार्यालयांचा परिसर स्वच्छ राहील याकरीता सुध्दा कार्यालय प्रमुख जबाबदार राहतील, त्या अनुषंगाने स्वच्छता राहील याची त्यांनी दक्षता घ्यावी.

४. सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयातील शौचालये स्वच्छ व वापरण्यायोग्य आहेत, तसेच तेथे पाण्याची पुरेशी सोय आहे याची दक्षता घेण्यात यावी.

५. स्वच्छतेच्या अनुषंगाने या कामांकरीता इतर विभागांच्या समन्वयाची आवश्यकता भासल्यास (जसे सार्वजनिक बांधकाम विभाग), कार्यालय प्रमुखांनी त्या-त्या संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन या सर्व कामांकरीता येणाऱ्या समस्यांचे निराकरण करावे.

६. कार्यालय तसेच कार्यालय परिसरातील स्वच्छता राखण्यासाठी विनावापरातील वाहने/फर्निचर/इलेक्ट्रॉनिक्स व विद्युत उपकरणे इत्यादी जड वस्तू यांची जाणीवपूर्वक विल्हेवाट लावण्यात यावी. तसेच जिल्हयातील कार्यालयात व पोलीस कार्यालयात जप्त केलेली / बेवारस व पडून असलेली वाहने, यंत्रे, जे.सी.बी., डंपर, रेती, खडी इत्यादींची योग्य त्या विहित मार्गाने (जसे लिलाव इत्यादी) विल्हेवाट लावावी.

७. कार्यालयीन अभिलेख तसेच दस्तऐवजांचे नियमानुसार निंदणीकरण करण्यात यावे.

**ब) समितीचे गठण:-**

कार्यालय आणि परिसर स्वच्छतेची अमंलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी जिल्हा स्तरावर दिनांक १०.१०.२०१८ पर्यंत खालीलप्रमाणे समिती गठीत करावी.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सह अध्यक्ष |
| ३ | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| ४. | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ५. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ६. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व), जिल्हा परिषद | सदस्य |
| ७. | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| ८. | जिल्हा महिला अधिकारी/कर्मचारी संघटनेने निर्देशित अधिकारी / कर्मचारी | सदस्य |

८. वरील समितीप्रमाणे प्रत्येक तालुकास्तरावर उप विभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी. या समितीमध्ये कोणत्या सदस्यांचा समावेश करण्यात यावा, याबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील. तथापि समितीमधील सदस्य शासकिय अधिकारी / कर्मचारी असतील याची दक्षता घ्यावी.

९. या दोनही समित्यांची बैठक दिनांक ११/१०/ २०१८ रोजी घेवून जिल्ह्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयांचे तालुका व ग्रामपंचायतनिहाय पत्ते, त्यांच्या कार्यालय प्रमुखांची नांवे, कार्यालय प्रमुखांचे संपर्क क्रमांक (दुरध्वनी/भ्रमणध्वनी) प्राप्त करून घ्यावेत. या सर्व कार्यालयात उपरोक्त "अ" येथील नमूद सूचनांप्रमाणे घ्यावयाच्या कामांची आखणी व वेळापत्रक तयार करून, त्या-त्या विविक्षित ठिकाणांसाठीच्या स्वच्छतेची जबाबदारी समितीकडून ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर सोपविण्यात आली आहे, त्यांची नांवे त्या कामापुढे नमूद करावीत.

१०.दिनांक १२/१०/२०१८ रोजी सर्व कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अखत्यारितील कार्यालयांची, कार्यालयातील सर्व शौचालयांची व कार्यालय परिसराची पाहणी करून संपूर्ण स्वच्छता करावयाच्या दृष्टीने कामांचे वाटप करावे व त्याची यादी करावी. तसेच त्या-त्या ठिकाणी असलेल्या अस्वच्छ बाबी व परिसराची छायाचित्रे काढून घेऊन संकलित करुन ठेवावी.

११.स्वच्छतेची जबाबदारी सोपविण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी पुढील पंधरवड्यात त्यांना नेमून दिलेल्या भागातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांच्या प्रमुखांच्या संपर्कात राहून उपरोक्त "अ" येथील नमूद सूचनांनुसार त्या- त्या कार्यालयात संपुर्ण स्वच्छता होईल, याची दक्षता घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबधित समितीकडे सादर करावा.

१२.स्वच्छता पंधरवड्यामध्ये नेमून दिलेल्या कामकाजानुसार कार्यवाही होवून, कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारची अस्वच्छता आढळणार नाही, ही बाब तसेच नेमून दिलेल्या कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारची अस्वच्छता आढळल्यास संबधिताविरूद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल, ही बाब कार्यालय प्रमुखांनी संबधितांच्या निदर्शनास आणावी.

१३.दिनांक १३/१०/२०१८ रोजी दुस-या शनिवारी (शासकीय सुट्टी) सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी नेहमीप्रमाणे आपआपल्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून, वर उल्लेखलेली स्वच्छतेची व कागदपत्र निंदणीकरणाची कामे करावी. दिनांक १३/१०/२०१८ या रजेच्या दिवशी कार्यालयीन कामकाज केल्याबद्दल संबधित कर्मचारी यांना नियमानुसार सक्षम प्राधिकारी यांनी बदली मंजूर करावी.

१४.यापुढील पूर्ण पंधरवड्यात दिनांक १९.१०.२०१८ व दिनांक २६.१०.२०१८ रोजी समिती अध्यक्षांच्या बैठका घेऊन कामाचा आढावा घ्यावा. या बैठकीत राज्य शासनाचे कर्मचारी / अधिकारी संघटनांच्या जिल्हा अध्यक्ष / सचिवांना आमंत्रित करुन फक्त कार्यालयातील व कार्यालयीन परिसरातील स्वच्छतेच्या विषयानुषंगाने त्यांचे अभिप्राय घ्यावेत. याच दरम्यान ज्या अस्वच्छ ठिकाणांची छायाचित्रे काढण्यात आली होती,

त्या-त्या ठिकाणांची स्वच्छतेनंतरची सुध्दा छायाचित्रे काढून त्यांना शिर्षक देऊन, संकलित करुन ठेवावीत. यांसह व घेतलेल्या उपक्रमाचा कार्यपालन अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक २६.१०.२०१८ च्या बैठकीत सादर करावा. (सोबतच्या परिशिष्ट "अ" व "ब" प्रमाणे) जिल्हास्तरीय समितीने परिशिष्टातील "ब" नमुन्यातील त्यांचा अहवाल माहे ऑक्टोबरच्या मासिक दैनंदिनीसोबत विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करावा.

१५. विभागीय आयुक्त यांनी झालेल्या कामांचा त्यांच्या विभागाचा अहवाल नमुना "ब"मध्ये आवश्यक तो बदल करुन शासनास (कार्यासन पापु-१६) दिनांक १० नोव्हेंबर, २०१८ पर्यन्त सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून,त्याचा संकेतांक क्रमांक २०१८१००६१६२३०८०८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करून निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Dinesh Kumar Jain

Digitally signed by Dinesh Kumar Jain
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Chief Secretary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ea3b8615acaf5a916338801298bc1b7123bd0cac17faf57848ccd7382e28252c, cn=Dinesh Kumar Jain
Date: 2018.10.06 17:43:54 +05'30'

**(दिनेश कुमार जैन)**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), मंत्रालय मुंबई यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), मंत्रालय मुंबई यांचे खाजगी सचिव
३) मा. मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई यांचे उप सचिव
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व जिल्हाधिकारी
७) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
९) सर्व मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१०) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई
११) सर्व उप सचिव/मुख्य अभियंता तथा विशेष कार्यकारी अधिकारी/अवर सचिव/कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. मंत्रालय, मुंबई.
१२) कार्यासन पापु-१६ संग्रहार्थ.

कार्यालयीन स्वच्छता पंधरवडा साजरा करणेबाबत शासन परिपत्रक

**क्र. स्वभामि-२०१८/प्र.क्र. ५१५/पापु-१६ दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१८ चे परिशिष्ट "अ"**

| अ.क्र. | विषय | माहिती |
|---|---|---|
| १. | अधिकाऱ्याचे नांव | |
| २. | विभाग | |
| ३. | संबंधित कार्यालयांची नांवे (जिल्हाधिकारी यादीतील अनुक्रमांक) | |
| ४. | एकूण अस्वच्छ बाबींची संख्या | |
| ५. | स्वच्छता पंधरवडयात घेतलेली कामे | १)<br>२)<br>३)<br>४) |
| ६. | स्वच्छतेच्या कामात सहभागी कर्मचारी / अधिकाऱ्यांची संख्या | |
| ७. | स्वच्छतेसाठी घेतलेल्या कामांचा एकूण कालावधी (मनुष्य तास) | |
| ८. | अस्वच्छ जागांच्या घेतलेलया छायाचित्रांची संख्या | |
| ९. | वरील ८ मधील जागांची स्वच्छता झाल्यावर घेतलेल्या छायाचित्रांची संख्या | |

## कार्यालयीन स्वच्छता पंधरवडा साजरा करणेबाबत शासन परिपत्रक

## क्र. स्वभामि-२०१८/प्र.क्र. ५१५/पापु-१६ दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१८ चे परिशिष्ट "ब"

| अ.क्र. | विषय | माहिती |
|---|---|---|
| १. | जिल्हयाचे नांव | |
| २. | एकूण शासकीय व निमशासकीय कार्यालयांची संख्या | |
| ३. | अ) दिनांक ११.१०.२०१८ ची | |
| ४. | ब) दिनांक १९.१०.२०१८ ची | |
| | क) दिनांक २६.१०.२०१८ ची बैठक झाली का? (वरील "अ","ब", "क" पुढील रकान्यात " होय " अथवा "नाही" नमूद करावे.) | |
| ५. | वरील दोनपैकी दिनांक १२.१०.२०१८ ची तपासणी झालेल्या कार्यालयांची संख्या | |
| ६. | जिल्हयातील शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील अस्वच्छ ठिकाणांची एकूण संख्या | |
| ७. | वरील ५ पैकी अस्वच्छ ठिकाणांच्या काढलेलया छायाचित्रांची संख्या | |
| ८. | वरील ६ पैकी स्वच्छता केल्यावर ठिकाणांच्या काढलेल्या छायाचित्रांची संख्या | |
| ९. | अभियानात सहभागी झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची एकूण संख्या | |

**ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता सुविधांचा शाश्वत वापर व उर्वरीत उद्दीष्ट पुर्ण करण्याकरिता स्वच्छाग्रहींची नियुक्ती करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
**शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१८/प्र. क्र. ६३५/पापु-१६**
७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल
लोकमान्य टिळक मार्ग, क्रॉफर्ड मार्केटजवळ, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख: २० डिसेंबर, २०१८

वाचा -

१) **केंद्र शासन, पेयजल व स्वच्छता मंत्रालय पत्र क्रमांक** एस-११०११/२०१८-एसबीएम, दिनांक ०७/०८/२०१८.

प्रस्तावना -

दिनांक २ ऑक्टोंबर २०१४ रोजी मा. पंतप्रधान महोदय यांनी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या अभियानाची सुरुवात केली. महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीवर्षा निमित्ताने म्हणजेच दिनांक ०२/१०/२०१९ अखेर संपूर्ण देश हागणदारीमुक्त करण्याचे निर्धारित केले आहे. त्या अनुषंगाने राज्यात आजपर्यंत स्वच्छता क्षेत्रात प्रभावी अंमलबजावणी झाली आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी संपूर्ण राज्य मार्च, २०१८ पर्यंत हागणदारीमुक्त करण्याचे आवाहन केले होते. सदर आवाहनानुसार २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार संपूर्ण महाराष्ट्र राज्य (ग्रामीण) दिनांक १८ एप्रिल २०१८ रोजी हागणदारीमुक्त झाले आहे. ग्रामपंचायतीमध्ये निर्माण झालेल्या स्वच्छता सुविधांचा शाश्वत वापर व्हावा व उर्वरीत उद्दीष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने स्वच्छाग्रहीच्या माध्यमातुन स्वच्छता अबाधित रहावी व लोकांच्या स्वच्छतेच्या सवयींमध्ये सकारात्मक बदल होण्याकरिता लोकसहभाग केंद्रस्थानी राहणे अत्यावश्यक आहे. लोकांच्या स्वच्छतेच्या समस्या तातडीने सोडविणे, गाव पातळीवरील स्वच्छतेचे नेतृत्व विकसित करण्यासाठी, स्वच्छाग्रही संकल्पना पुढे आली आहे.

०२. गावपातळीवर वैयक्तिक, सार्वजनिक व संस्थात्मक स्वच्छता सुविधांची निर्मिती, देखभाल व वापर, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, शुध्द पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व सुरक्षितता निर्माण करण्यासाठीच्या उपाययोजना निश्चित करुन लोकसहभाग सक्रिय करणे अपेक्षित आहे.

०३. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत स्वच्छतेचे स्वरुप व्यापक असून यामध्ये स्वच्छतेशी संबंधित घटकांचा समावेश केला आहे. ग्रामीण कुटुंबांकडे अजूनही काही ठिकाणी स्वच्छता सुविधा उपलब्ध नाहीत. स्वच्छता सुविधांची गुणवत्ता आणि शाश्वतता, सामाजिक आणि वैयक्तिक वर्तन बदलातील सातत्य या संबंधिचे अनेक प्रश्न देखील समोर आले आहेत. या बाबी अधिक गतिमान

आणि गुणवत्त्तापुर्ण करण्यासाठी आणि शाश्वत स्वच्छतेचे उद्दिष्ठ गाठण्यासाठी गावपातळीवर स्वच्छाग्रहीची नेमणूक करणे, नियुक्तीचे उद्दिष्ठ, कर्तव्य व जबाबदारी, प्रोत्साहन रक्कम, पात्रता, निवड व इतर अनुषंगिक बाबींच्या अनुषंगाने, सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून खालीलप्रमाणे सविस्तर सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय-**

**३.१. स्वच्छाग्रही नियुक्ती उद्देश :-**

१) गावामध्ये स्वच्छतेच्या सुविधांच्या वापरात सातत्य टिकवणे .

२) पाणी व स्वच्छतेच्या सवयीत व लोकांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडविणे. स्वच्छतेच्या कामात ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग असण्यासाठी ग्रामस्थांना प्रवृत्त करणे.

३) गावातील लोकांना शौचालय बांधकाम, वापर, देखभाल दुरुस्ती इ. बाबत मार्गदर्शन करणे.

४) पाणी व स्वच्छता विषयक बाबींमध्ये सुलभकर्ता म्हणून भूमिका पार पाडणे.

५) शौचालय नसलेल्या कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधकाम करण्यास प्रेरीत करुन त्याचा नियमित वापर करण्यासाठी प्रवृत करणे.

**३.२. स्वच्छाग्रहींची कर्तव्ये:-**

१) गावपातळीवरील स्वच्छतेमध्ये सातत्य टिकवून ठेवण्यासाठी, ग्रामपंचायत/ निगराणी कृती गट यांच्याशी समन्वय राखणे.

२) शौचालयाचा नियमित वापर करण्याकरीता गृहभेटीद्वारे कुटुंबांना प्रवृत्त करणे.

३) ग्रामस्थांच्या स्वच्छताविषयक सवयीत सकारात्मक बदल घडविणे.

४) पाणी व स्वच्छतेच्या निर्माण झालेल्या स्वच्छता सुविधांची शाश्वतता टिकवून ठेवण्याच्या दृष्टिने काम करणे.

५) गावातील वंचित असलेल्या समुदायापर्यंत पोहचून त्यांच्या वर्तणूकीमध्ये बदल घडवून त्यांना वैयक्तिक स्वच्छतेसाठी प्रवृत करणे.

६) लहान मुलांच्या विष्टा व्यवस्थापनाबाबत कुटुंब /अंगणवाडी/शालेय स्तरावर जनजागृती करणे.

७) वैयक्तिक व सार्वजनिक आरोग्यास उपकारक असलेल्या स्वच्छतेच्या सवयीचा अवलंब करण्याबाबत ग्रामस्थांना प्रवृत करणे.

८) वैयक्तिक स्वच्छतेसाठी हात धुणे विषयीचे महत्व पटवून देणे.

९) पिण्याच्या पाण्याची सुरक्षित हाताळणी व साठवण ठेवण्याविषयी महत्व पटवून देणे.

१०) कुटुंब/सार्वजनिक स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी प्रवृत करणे.

११) शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता विषयक विविध उपक्रमांची गाव स्तरावर अंमलबावणी करणे.

१२) ग्रामसभा/ग्रामपंचायत मासिक सभेमध्ये स्वच्छता विषयक बाबींचा आढावा अहवाल सादर करणे.

**३.३. स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत स्वच्छाग्रहींना खालील तीन टप्प्यात कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहेत:-**

१. नियोजन २. अंमलबजावणी व ३. शाश्वतता

**३.३.१ टप्पा क्रमांक १--नियोजन**

**नियोजन टप्प्यात स्वच्छाग्रहींनी करावयाची कामे :-**

१) स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत स्वच्छतेच्या विविध उपक्रमासाठी गावपातळीवरील समूहाला प्रोत्साहित करणे

२) गावातील सर्व कुटुंबांना वारंवार गृहभेटी देऊन शौचालय वापराबाबत खात्री करणे व त्याच्या अद्ययावत नोंदी ठेवणे

३) ग्रामपंचायतीचा शाश्वत स्वच्छता कृती आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभाग घेवून, सहाय्य करणे.

४) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता निगराणी कृती गट, सरपंच, ग्रामसेवक यांना ग्रामपंचायत स्तरावरील स्वच्छता विषयक बाबींमध्ये सहाय्य करणे.

५) कुटुंबामध्ये वैयक्तिक व सामूहिक स्वच्छतेबाबत जनजागृती करणे व नवीन कुटुंबांना शौचालय बांधण्यासाठी प्रवृत्त करणे.

६) गावाचा हागणदारीमुक्तीचा दर्जा कायम ठेवण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर साजरा करण्यात येत असलेल्या स्वच्छता दिवस, पर्यावरण दिवस, महात्मा गांधी जयंती व इत्यादी यासारख्या विविध शासकीय उपक्रमामध्ये सहभागी होणे व कार्यक्रम पार पाडण्याकरिता मदत करणे.

७) गावातील तात्पुरत्या स्वरुपात स्थायी झालेले कुटुंब, बाजाराची ठिकाणे, यात्रास्थळे या सारख्या सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेच्या सुविधाची आवश्यकता पाहता अशा ठिकाणी सार्वजनिक शौचालयांची आवश्यकता तसेच अशा सार्वजनिक शौचालयांची ग्रामपंचायतीकडून नियमित देखभाल व दुरूस्ती होणे आवश्यक आहे, हि बाब ग्रामसेवक आणि सरपंच यांच्या निदर्शनास आणून देणे.

**३.३.२ टप्पा क्रमांक २--अंमलबजावणी -**

**अंमलबजावणी टप्प्यात स्वच्छाग्रहींनी करावयाची कामे :-**

१) गावामध्ये प्रशिक्षित व कुशल गवंडी/प्लंबर यांची पुरेशा प्रमाणात उपलब्धता आहे, हि बाब कुटुंबांच्या निदर्शनास आणून देणे. अर्धकुशल गवंडयांना गुण कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी प्रवृत करणे.

२) तांत्रिक दृष्ट्या योग्य शौचालय बांधण्यासाठी कुटुंबांना प्रोत्साहित करणे.

३) शौचालय बांधकामासाठी लागणारे साहित्य पुरवठा करणा-या पुरवठादारांची माहीती /तपशिल संबधितांना उपलब्ध करुन देणे.

४) दोन शोषखड्डयांच्या शौचालय बांधकामाबाबत कुटुंबांना व गवंड्यांना आवश्यक तेव्हा तांत्रिक मार्गदर्शन करणे.

५) शाळा, अंगणवाडी, आरोग्य विभाग व ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये येणा-या शौचालयाचा नियमित वापर व शौचालयाच्या देखभाल व दुरूस्ती संदर्भात संबंधितांना प्रवृत्त करणे.

६) स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) च्या विविध कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता स्थानिक सहभागदार, ग्रामपंचायत, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, शिक्षक यासारख्या विविध घटकांमध्ये समन्वय ठेवणे.

७) स्थानिक संस्था, महिला बचत गट, युवा मंडळ, महिला मंडळ, यासारख्या विविध सेवाभावी संस्था/संघटना/प्रतिष्ठीत व्यक्ती यांच्याशी सातत्याने संवाद साधणे, स्वच्छता विषयक अभियानामध्ये सक्रिय सहभाग मिळवणे व वाढविणे.

८) लोकसहभागातून विविध उपक्रम गावपातळीवर राबविण्याकरिता आयोजित करण्यात येणा-या कार्यक्रमामध्ये निगराणी कृती गट, महत्त्वाचे प्रतिष्ठीत व्यक्ती, विविध सामाजिक घटकांचा सहभाग मिळण्याकरिता त्यांना प्रवृत्त करणे.

९) पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ( निगराणी कृती समिती असल्यास त्या समितीच्या ) गटाचे सदस्य आणि स्थानिक प्रभावी व्यक्ती यांच्या बरोबर गावपातळीवरील समूदायाच्या सार्वजनिक ठिकाणी कोपरा/नुक्कड ( कॉर्नर ) बैठका तसेच शाळा आणि अंगणवाडी समवेत बैठकांचे नियोजन करणे.

१०) स्वच्छता विषयक प्रभात फेरी,रात्र बैठका,सकाळच्या भेटी अशा प्रकारचे विविध कार्यक्रम राबविणे.

११) गावाच्या संदर्भातील विविध यशोगाथा एकत्रित करण्यासाठी सहाय्य करणे.

१२) तालुका व जिल्हा स्तरावरून मंजूर झालेल्या विविध उपक्रमांची कुटुंबस्तरावर प्रभावी अंमलबजावणी करणे व अहवाल तयार करणे.

**३.३.३ टप्पा क्रमांक ३- शाश्वतता -**

**शाश्वत स्वच्छतेचे सातत्य राखण्याच्या टप्प्यात स्वच्छाग्रहींनी करावयाची कामे :-**

१) नवीन बांधकाम होत असलेल्या व केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर नोंदणी झालेल्या कुटुंबाच्या शौचालयांचे फोटो काढणे.

२) नादुरुस्त शौचालये दुरुस्त करून, त्याचा नियमित वापर करण्यासाठी कुटुंबांना प्रवृत्त करणे, संस्थात्मक शौचालयाच्या दुरुस्तीसाठी पाठपुरावा करणे.

३) शौचालय बांधकाम दुरुस्तीसाठी आर्थिक सहाय्य मिळणाऱ्या विविध योजनांची माहिती कुटुंबांना देणे.

४) हागणदारीमुक्तीचा दर्जा कायम राखण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमास सहाय्य करणे.

५) वैयक्तिक शौचालय वापर व स्वच्छतेसाठी पुरेशा पाण्याची व्यवस्था असल्याबाबत खात्री करणे व वैयक्तिक शौचालय वापर व स्वच्छतेसाठी कुटुबांना प्रोत्साहित करणे.

६) शाळा, अंगणवाडी, आरोग्य विभाग येथे शाश्वत स्वच्छता जाणीव जागृतीचे उपक्रम घेणे.
७) सार्वजनिक शौचालयाचा वापर, देखभाल दुरुस्ती व नियमित स्वच्छतेसाठी पाठपुरावा करणे.
८) शाश्वत स्वच्छतेसाठी गुड मॉर्निंग पथक व इतर माध्यमातून जाणीव जागृतीचे उपक्रम घेणे.
९) एक खड्डयाचे शौचालय असल्यास त्या कुटुबांना दुसरा खड्डा बांधण्यास प्रवृत्त करणे. शौचालयाच्या सेप्टीक टाकीच्या पाईप मधून निचरा होणारे पाणी सार्वजनिक गटारामध्ये न सोडता त्याकरिता शोषखड्डा घेण्यास संबधित कुटुंबांना प्रवृत्त करणे.
१०) तांत्रिक दृष्टया मैला व्यवस्थापन करण्यास गावातील कुटुंबांना सहाय्य करणे.
११) मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन संदर्भात स्वच्छता विषयीची मुलभूत संकल्पना अवगत करणे.

**३.४ हागणदारीमुक्त अधिक ( ODF +)**

१) हात धुण्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता शाळा व अंगणवाडी येथे विविध उपक्रम घेणे.
२) सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, गोबरधन इत्यादीचा आराखडा तयार करण्यास व अंमलबजावणी करण्यास सहाय्य/मदत करणे.
३) पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत्र व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची ठिकाणे येथे स्वच्छता राखण्यासाठी मार्गदर्शन करणे.
४) मासिक पाळी नियोजन बाबत जनजागृती करणे

**४. स्वच्छाग्रही निवडः-**

**४.१ निवड पध्दती-**

i. स्वच्छाग्रहीच्या नियुक्तीबाबत गावात सार्वजनिक ठिकाणी नोटीस बोर्डवर प्रसिध्दी व दवंडी देऊन प्रसिध्दी देण्यात यावी.
ii. इच्छूक उमेदवारांनी ग्रामपंचायतीकडे अर्ज सादर करावा.
iii. अर्ज न आल्यास ग्रामपंचायतीने ग्रामसभेमध्ये पात्र व्यक्तीचे नामांकन घोषित करावे.
iv. स्वच्छाग्रही ही स्वंयप्रेरीत सेवा असून इच्छूक स्वच्छाग्रहीची निवड प्रत्यक्ष ग्राम सभेतून करण्यात येईल.
v. जिल्हास्तरावरुन वेळोवेळी देण्यात येणाऱ्या स्वच्छते विषयीच्या सूचना व कार्यक्रमाच्या अनुषंगाने गाव पातळीवर स्वच्छाग्रही प्रतिनिधी म्हणून कार्य करेल. स्वच्छाग्रहीची निवड अंतिम करण्यापूर्वी या शासन निर्णयातील सर्व तरतूदी संबधित उमेदवाराच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी ही संबधित ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांची राहिल. ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवाल/शिफारशीच्या आधारे स्वच्छाग्रही नियुक्तीचे आदेश गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी निर्गमित करावे.
vi. नियुक्त करावयाच्या स्वच्छाग्रहीची नोंद संबधित ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांनी केंद्र शासनाच्या SBM-G च्या संकेतस्थळावर करावी. सदरची नोंद कोणत्याही परिस्थितीत ३१/१२/२०१८ पूर्वी करण्यात यावी. सदर नोंद झाल्यानंतरच स्वच्छाग्रहीच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात यावी.

**४.२ स्वच्छाग्रहीं संख्या-**

प्रत्येक गावाकरिता एक स्वच्छाग्रही नियुक्त करण्यात यावा. तथापि ज्या गावांची कुटुंब संख्या २५० पेक्षा जास्त असेल अशा गावामध्ये प्रत्येक २५० कुटुंबाकरिता एक याप्रमाणे स्वच्छाग्रहीची नियुक्ती करण्यात यावी. विना प्रोत्साहन स्वंयस्फुर्तीने स्वच्छाग्रही म्हणून काम करण्यास इच्छूक असणा-या व्यक्तिची स्वच्छाग्रही म्हणून नियुक्ती करण्यात यावी तथापि त्यांना कोणत्याही प्रकारच्या प्रोत्साहनाची रक्कम अदा करण्यात येवू नये. स्वच्छाग्रहीच्या नियुक्ती बाबतची नोंद SBM-(G) MIS वर घेणे आवश्यक राहिल. त्याच बरोबर स्वच्छाग्रहींच्या बँक खात्याची माहिती संकलित करून ठेवावी.

**४.३ पात्रता-**

१) स्वच्छाग्रही हा स्थानिक पातळीवरील असावा तसेच तो साक्षर, स्वयंप्रेरीत, सामाजिक कामाची आवड असणारा, वेळ देणारा, लोकसंपर्क, संवाद कौशल्य आणि तांत्रिक माहिती असणारा असावा.

२) स्वच्छाग्रहीकडे वैयक्तिक शौचालय असणे आवश्यक आहे.

**४.४ प्राधान्य-**

१) स्वच्छाग्रही म्हणून निवड करताना, ग्रामपंचायत कर्मचारी, जलसुरक्षक, ग्रामरोजगार सेवक, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका/मदतनीस, यांना इच्छुकतेनुसार प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

२) इच्छूक महिला उमेदवारांस प्राधान्य द्यावे.

**४.५ स्वच्छाग्रहींना साहित्य वाटपाबाबत कार्यवाही -**

४.५.१ स्वच्छताग्रही यांना प्रत्यक्ष काम करण्याकरिता शासन निर्णय अनुक्रमांक ४.५.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असलेले साहित्य पुरवठा करण्याबाबतचा अहवाल प्रत्येक पंचायत समितीने, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साहित्याची खरेदी करून, पंचायत समिती निहाय साहित्याचे वाटप करावे व पंचायत समितीने त्यांच्या नियंत्रणाखाली असणा-या ग्रामपंचायतीमध्ये नियुक्त केलेल्या स्वच्छाग्रहींच्या संख्येनुसार ग्रामसेवक वा ग्राम विकास अधिकारी यांच्यामार्फत साहित्याचे वाटप करावे. ग्रामसेवक वा ग्राम विकास अधिकारी यांनी सदर साहित्य स्वच्छाग्रही यांना दिल्याबाबतची पोच प्राप्त करून घ्यावी. एखाद्या स्वच्छाग्रहीची नियुक्ती रद्द केल्यास सदर साहित्य परत घेण्याची जबाबदारी ग्रामसेवक वा ग्राम विकास अधिकारी यांची राहिल.

**४.५.२ स्वच्छाग्रहींना दयावयाचे साहित्य -**

१. संवाद टुल किट/ २. आय-कार्ड /३. टि-शर्ट, टोपी आणि शिट्टी /४. ॲप्रॉन /५. बॅटरी

**४.६ मुल्यांकन**

स्वच्छाग्रहींचे कर्तव्य व जबाबदारी विचारात घेता, या निर्णया सोबतच्या परिशिष्ठा मध्ये नमूद केलेले काम झाल्याची खात्री केल्यानंतरच प्रत्यक्ष केलेल्या कामांचा मुल्यांकन अहवाल व

स्वच्छाग्रहींना अनुज्ञेय असलेल्या प्रोत्साहनाची रक्कम स्पष्टपणे नमूद करून स्वंयस्पष्ट शिफारशीसह ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांनी स्वाक्षरित अहवाल प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या तारखेला ( ३० वा ३१) गट विकास अधिकारी, यांच्याकडे ई-मेलद्वारे पाठविण्यात येवून, त्याची प्रत थेट सादर करावी. स्वच्छाग्रहींना नेमुन देण्यात आलेल्या कर्तव्य व जबाबदारी नुसार प्रत्यक्ष केलेल्या कामाचा अहवाल ग्रामसेवकाने दर ३ महिन्यांनी ग्रामसभेमध्ये सादर करावा. स्वच्छाग्रहीने केलेले काम असमाधानकारक असल्यास, संबधित स्वच्छाग्रही यांना त्यांचे म्हणणे लेखी सादर करण्याची संधी देवून, ग्रामसभेच्या ठरावाद्वारे निवड रद्द करण्यात येऊन प्राधान्य क्रमानुसार अन्य इच्छूक व्यक्तीची स्वच्छाग्रही करिता निवड करावी.

**४.७ स्वच्छाग्रहींना अदा करावयाची प्रोत्साहन रक्कम:-**

उपरोक्त ४.६ मध्ये नमूद केल्यानुसार प्राप्त होणारा मुल्यांकन अहवाल व शिफारस यांच्या तपासणीअंती गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी संबधित स्वच्छाग्रहीच्या वैयक्तिक खात्यावर आर.टी. जी. एस. द्वारे प्रोत्साहन रकमेचे भूगतान करावे.

**स्वच्छाग्रहींना अनुज्ञेय करावयाच्या प्रोत्साहन रक्कमेबाबतचे परिशिष्ठ सोबत जोडण्यात आले आहे.**

**५. स्वच्छाग्रहीं कामकाज कार्यपध्दती व सनियंत्रण :-**

१) शाश्वत स्वच्छतेच्या उपलब्ध सुविधाचा नियमित वापर व सातत्य राखण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वेळेनुसार व अनौपचारीक पध्दतीने काम करणे आवश्यक आहे.

२) स्वयंप्रेरणेतून उद्दिष्ट प्राप्तीसाठी लोकसहभागाव्दारे कार्य करणे आवश्यक आहे.

३) स्वच्छाग्रहीने स्वत: सोबतच या कामासाठी अधिकाधिक व्यक्ती व व्यक्तीचा समुह सहभागी करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**स्वच्छाग्रहींचे सनियंत्रण :-**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

↓

गट विकास अधिकारी

↓

विस्तार अधिकारी (पंचायत)

↓

(गट समन्वयक/समुह समन्वयक)

↓

ग्रामपंचायत (ग्रामसेवक)/(गट समन्वयक/समुह समन्वयक)

↓

स्वच्छाग्रही

६. क्षमता बांधणी:-

स्वच्छाग्रही सक्षमरित्या काम करु शकेल यासाठी स्वच्छाग्रहींच्या क्षमता बांधणीसाठी स्वच्छता कार्यक्रम, संवाद कौशल्य, संघटन, सनियंत्रण, तांत्रिक ज्ञान इ. संदर्भातील कौशल्य विषयक प्रशिक्षणाची आवश्यकता असून, अशा प्रकारचे प्रशिक्षण गट विकास अधिकारी यांनी तालुका स्तरावर आयोजित करावे.

**स्वच्छाग्रहींसाठी महत्वाच्या सूचना :-**

| काय करावे ( Do's) | काय करू नये ( Don't) |
|---|---|
| १. समन्वयाची भुमिका असावी. | १. तपासणी करण्याच्या भुमिकेत जाऊ नये. |
| २. स्वच्छतेविषयीच्या अडचणी दूर करणे. | २. वादात्मक विधाने करु नये. |
| ३. वर्तणुक बदलासाठी प्रयत्न करणे. | ३. चूकीचे सल्ले व आश्वासने देऊ नयेत. |
| ४. वस्तुनिष्ठ अहवाल दयावा. | ४. अयोग्य मार्गदर्शन करु नये. |
| ५. लोकांच्या उपलब्ध वेळेत भेट द्यावी. | ५. स्वत:ची मते लादू नये. |
| ६. पाणी व स्वच्छतेविषयी सातत्य टिकविण्यासाठी संवाद साधणे. | ६. निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ नये. (निपक्ष) |

७. उपरोक्त शासन निर्णय हा सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता लागू असून, सन २०१९-२० या वर्षाकरीता स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल. उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने काही अडचणी उद्भवल्यास त्यानुषंगाने अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे राहतील.

८. स्वच्छाग्रहींना अदा करावे लागणारे प्रोत्साहन रक्कम, प्रशिक्षण खर्च, साहित्य पुरवठा करिता होणारा हा खर्च "मागणी क्रमांक वाय-०२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०२ जलनि:स्सारण व स्वच्छता, १०७ मलप्रणाल सेवा, (०२) ग्रामसफाई कार्यक्रम, (०२) (१०) निर्मल भारत अभियान केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत शौचालय बांधणे (सर्वसाधारण घटक) (केंद्र हिस्सा) (२२१५ ९८३५), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली खर्चीत करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१२२०१५५३२५१७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2018.12.20 18:05:05 +05'30'

(स्मिता.स.राणे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.

२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा.विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
६. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.
८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष, सर्व.
९. विभागीय आयुक्त, सर्व
१०. जिल्हाधिकारी, सर्व.
११. महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
१३. उपायुक्त (विकास), सर्व.
१४. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती/उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.
१५. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
१६. संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.
१७. निवडनस्ती, पापु-१६.

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक : स्वभामि-२०१८/प्र.क्र. ५३२/पापु-१६, दिनांक २०/१२/२०१८ सोबतचे परिशिष्ठ (परि. ४.७)

### स्वच्छाग्रही प्रोत्साहन- गावनिहाय/युनिट निहाय

| अ. क्र. | तपशिल | रक्कम | एकक | एकूण खर्च प्रति एकक (रू. लक्ष) | कालावधी महिने/ एकक | कार्यकाल गृहित धरून एकूण अंदाजित खर्च (रू.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नादुरूस्त शौचालयाची संपूर्णपणे दुरूस्ती झाल्याची खात्री करणे. | रू. २५/- प्रति दुरूस्त शौचालय | ४३,१९०/- शौचालये | १०.७९/- | ३ महिने | १०.७९/- |
| २ | एक शोष खड्डा असलेल्या शौचालयाचे दोन शोष खड्डा शौचालयामध्ये तांत्रिकदृष्ट्या योग्य बांधकाम केल्याबाबत खात्री करणे.<br>१.एक खड्ड्याच्या शौचालयाचे दोन खड्ड्याच्या शौचालयामध्ये रूपांतर करणे.<br>किंवा<br>२. शोष खड्डे नसलेले सेप्टीक टाकी शौचालय असणाऱ्यास त्यासोबत शोष खड्डा बांधण्यास प्रवृत्त करणे. | रू. ५०/-प्रति कुटुंब | ४,२८,५३१ कुटुंबे | २१४.२६/- | ३ महिने | २१४.२६/- |
| ३ | सार्वजनिक शौचालयाची योग्य रितीने देखभाल व स्वच्छता झाल्याची खात्री करणे. (पंधरा दिवसातून एकदा) | रू. १००/-प्रति शौचालय | १७,७७५ सार्वजनिक शौचालये | १७.७७/- | ३ महिने | १०६.६५/- |
| ४ | सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रक्रिया व देखरेख करण्याच्या अनुषंगाने, गावातील लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याकरिता खालील बाबतीत खात्री करणे. (खालील बाबींच्या संदर्भात काम झाल्याबाबतचा ग्रामपंचायतीकडील कागदोपत्री पुरावा | | | | रकाना क्रमांक २ मधील कामे जाने-१९ ते मार्च १९ पर्यंत करणे अपेक्षित आहे. | एकूण ३३१५/- |

| अ. क्र. | तपशिल | रक्कम | एकक | एकूण खर्च प्रति एकक (रू. लक्ष) | कालावधी महिने/ एकक | कार्यकाल गृहित धरून एकूण अंदाजित खर्च (रू.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| | सादर केल्यानंतरच प्रोत्साहन रक्कम अनुज्ञेय राहिल.) | | | | | |
| | अ) सांडपाणी | | | | | |
| | १) ग्रामपंचायतीकरिता सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प बांधकाम करणे. | १) प्रत्येक प्रकल्प रू. २०००/- | २००० ग्रामपंचायती (सन २०१८-१९ मध्ये) | ४०/- | | |
| | ब) घनकचरा | | | | | |
| | १) कचऱ्याचे ओला व सुका मध्ये वर्गीकरण करणे. | १) रू. १०/- प्रति कुटुंब | १० लाख कुटुंबे | १००/- | | |
| | २) गावपातळीवरील गांडुळखत प्रकल्पाची उभारणी व व्यवस्थापन. | २) रू. १०००/- प्रति प्रकल्प | ५००० गावे | ५०/- | | |
| | ३) कुटुंब स्तरावर गांडुळखत किंवा कंपोस्ट खत प्रकल्प करणे. | ३) रू. २५/- प्रति कुटुंब | १.२५ कोटी कुटुंबे | ३१२५/- | | |
| ५ | १. गावठाणात संपुर्णपणे पक्क्या गटाराचे बांधकाम करणे (एकाच वेळी) (काम पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या निधीमधून अपेक्षित नाही.) | रू. १०००/- | ४०,५०० गावे | ४०५/- | रकाना क्रमांक २ मधील कामे डिसें-१८ ते मार्च १९ पर्यंत करणे अपेक्षित आहे. | एकूण १४९८.५०/- |
| | २. वैयक्तिक शोषखड्ड्याचे बांधकाम (एकाच वेळी-प्रत्येक नवीन खड्ड्यास ) (प्रत्येक गावामध्ये जास्तीत जास्त २० शोषखड्ड्यांचे बांधकाम करणे) | रू. २५/ प्रती शोषखड्डा | ८,१०,००० शोषखड्डे | २०२.५०/- | | |

| अ. क्र. | तपशिल | रक्कम | एकक | एकुण खर्च प्रति एकक (रू. लक्ष) | कालावधी महिने/ एकक | कार्यकाल गृहित धरून एकूण अंदाजित खर्च (रू.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३. सामुहिक कंपोष्ट खड्ड्याचे बांधकाम (एकाच वेळी-प्रत्येक नवीन कंपोष्ट खड्ड्यास ) (प्रत्येक गावामध्ये जास्तीत जास्त २ सामुहिक कंपोस्ट शोषखड्ड्यांचे बांधकाम करणे)<br><br>४. सामुहिक बायोगॅस संयंत्र बांधकाम (एकाच वेळी-प्रत्येक नवीन संयंत्रास ) (प्रत्येक गावामध्ये जास्तीत जास्त २ सामुहिक बायोगॅस संयंत्र बांधकाम करणे) | रू. १००/-<br><br>रू. १०००/- | ८१,००० कंपोष्ट खड्डे<br><br>८१,००० सामुहिक बायोगॅस संयंत्र | ८१/-<br><br>८१०/- | | |
| ६ | गावातील तलाव, गटारे, रस्ते, स्थानिक बाजारपेठ, इ. ची स्वच्छता झाल्याबाबतची खात्री करणे व याबाबतचा ग्रामपंचायतीकडील अहवाल सादर करणे (१५ दिवसांनी) | रू. ५०/-प्रति गाव | ४०,५०० गावे | २०.२५/- | ३ महिने | १२१/- |
| ७ | गावातील नळ पाणी पुरवठा करणाऱ्या पिण्याच्या पाण्याची टाकीची/टाक्यांची स्वच्छता झाल्याबाबतची खात्री करणे व याबाबतचा ग्रामपंचायतीकडील अहवाल सादर करणे.<br>( ३ महिन्यातून एक वेळा) | रू. १००/-प्रति ग्रामपंचायत | २७,६६७ ग्रामपंचायती | २७.६६/- | ३ महिने | २७.६६/- |
| ८ | शाश्वत स्वच्छता व ODF च्या समस्येबाबत ग्रामस्थांची सरपंच व ग्रामसेवका समवेत बैठक आयोजित करणे (महिन्यातून एकवेळा) | रू.५०/-प्रति ग्रामपंचायत | २७,६६७ ग्रामपंचायती | १३.८३/- | ३ महिने | ४१.४९/- |
| ९ | ODF ची शाश्वतता राखण्याकरिता खालील सर्व | | | | | ५८१.८५/- |

120

| अ. क्र. | तपशिल | रक्कम | एकक | एकूण खर्च प्रति एकक (रू. लक्ष) | कालावधी महिने/ एकक | कार्यकाल गृहित धरून एकूण अंदाजित खर्च (रू.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| | उपाययोजना राबविणे. (खालील बाबींच्या संदर्भात काम झाल्याबाबतचा ग्रामपंचायतीकडील कागदोपत्री पुरावा सादर केल्यानंतरच प्रोत्साहन रक्कम अनुज्ञेय राहिल) | | | | | |
| | १. स्थानिक संस्थात्मक इमारतीमधील शौचालयांची दुरूस्ती/स्वच्छता (उदा. शाळा, अंगणवाडी, सामुहिक शौचालय, प्राथमिक आरोग्य केंद्र ) (महिन्यातून एकवेळा) | रू.२००/- प्रति गाव | ४०,५०० गावे | ८१/- | ३ महिने | २४३/- |
| | २. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, ग्रामपंचायत, जिल्हा व राज्य ODF दिन, स्वच्छता दिन या दिवशी घोषित ODF गावाची स्थिती शाश्वत राखण्याकरिता, गावमध्ये सरपंच व ग्रामसेवक यांच्या मदतीने कार्यक्रम आयोजित करण्यात येवून, सदर कार्यक्रमामध्ये उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने उपस्थितांना प्रबोधन करणे. (महिन्यातून एकवेळा ) | रू. १००/- प्रति गाव | ४०,५०० गावे | ४०.५०/- | ३ महिने | १२१.५० /- |
| | ३. हागणदारीमुक्त अधिक (ODF+) व शाश्वत स्वच्छतेबाबत प्रचार व प्रसिद्धी, भिंती संदेश, फलक लावणे. (फक्त एकवेळा) | रू.१००/- प्रति ग्रामपंचायत | २७,६६७ ग्रामपंचायती | २७.६६-/ | ३ महिने | २७.६६/- |
| | ४. गाव हागणदारीमुक्ती नंतर नवीन घर/ कुटुंबांना शौचालयाच्या बांधकामाची आवश्यकता या अनुषंगाने ग्रामसभेस ठराव पारित करणेस प्रवृत्त करणे. (ग्रामसभेनुसार- एका पेक्षा जास्त स्वच्छाग्रहींची नियुक्ती केली असल्यास रक्कम विभागून देणे) | रू.१००/- प्रति ग्रामपंचायत | २७,६६७ ग्रामपंचायती | २७.६६-/ | मार्च २०१९ पर्यंत | २७.६६/- |

| अ. क्र. | तपशिल | रक्कम | एकक | एकूण खर्च प्रति एकक (रू. लक्ष) | कालावधी महिने/ एकक | कार्यकाल गृहित धरून एकूण अंदाजित खर्च (रू.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | हागणदारीमुक्ती नंतर नवीन घर/ कुटुंबांना शौचालय बांधकामाकरिता प्रवृत्त करणे व सुविधा पुरविणे. (फक्त एकवेळा) | रू. २५ प्रति नविन बांधलेले शौचालय | ११,८८,८५५ शौचालय | २९७.२१/- | मार्च, २०१९ पर्यंत | २९७.२१/- |
| ११. | शाळा व अंगणवाडी मध्ये नखे कापणे, हात स्वच्छ धुण्याचे प्रात्याक्षिक देणे (महिन्यातून एकवेळा) | रू. २५/- प्रति ग्रामपंचायत | २७,६६७ ग्रामपंचायती | ६.९१/- | ३ महिने | २०.७५/- |
| | एकूण | | | ५५९९.०० | | ६६५५.९८ |

ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी मुख्य संसाधन संस्थांची निवड करण्यासाठी समित्यांची स्थापना करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
## शासन निर्णय क्रमांकः स्वभामि २०१९/प्र.क्र. ८०/पापु-१६

७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
तारीख: ६ जून, २०१९

**वाचा :-** शासन निर्णय क्रमांक केआरसी ३६१४/प्र.क्र.१२/पापु ०८, दिनांक १ सप्टेंबर २०१४

**प्रस्तावना :-**

ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी मुख्य संसाधन संस्थांची निवड करणेबाबत शासन निर्णय दिनांक १ सप्टेंबर, २०१४ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.सदर शासन निर्णयात मुख्य संसाधन संस्थांच्या निवड प्रक्रियासंबंधी प्रस्ताव छाननी समिती, जिल्हास्तरीय क्षेत्रीय भेट समिती व राज्यस्तरीय निवड समितीचा तपशील परिशिष्ट १ मध्ये जोडला आहे असे नमूद आहे. तथापि, सदर शासन निर्णयासोबत समितीचा तपशिल उपलब्ध नाही. त्यानुषंगाने सदर समित्या गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त दिनांक १ सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयात संचालक, वासो यांचेकडे राज्य मुख्य संसाधन संस्थांकरिताचे प्रस्ताव व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे जिल्हा मुख्य संसाधन संस्थांकरिताचे प्रस्ताव सादर करावेत असे नमूद आहे. त्यानुसार राज्य व जिल्हास्तरांवर पुढीलप्रमाणे समित्या गठीत करण्यात येत आहेत.

| राज्यस्तरीय छाननी समिती | | |
|---|---|---|
| **क्र.** | **अधिकारी पदनाम** | **पदनाम** |
| १. | संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर. | अध्यक्ष |
| २. | कक्ष अधिकारी, कार्यासन पापु १६ | सदस्य |
| ३. | लेखाधिकारी, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर. | सदस्य |
| ४. | मनुष्यबळ विकास सल्लागार, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर. | सदस्य सचिव |

| जिल्हास्तरीय छाननी समिती | | |
|---|---|---|
| क्र. | अधिकारी पदनाम | पदनाम |
| १. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद. | अध्यक्ष |
| २. | समाजशास्त्रज्ञ तज्ञ,जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद. | सदस्य |
| ३. | क्षमता बांधणी तज्ञ, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद. | सदस्य |
| ४. | मनुष्यबळ विकास सल्लागार,जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद. | सदस्य सचिव |

| जिल्हास्तरीय क्षेत्रीय भेट समिती | | |
|---|---|---|
| क्र. | अधिकारी पदनाम | पदनाम |
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद. | अध्यक्ष |
| २. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद. | सदस्य |
| ३. | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद. | सदस्य |
| ४. | स्वच्छता तज्ञ, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद. | सदस्य सचिव |

| राज्यस्तरीय निवड समिती | | |
|---|---|---|
| क्र. | अधिकारी पदनाम | पदनाम |
| १. | अ.मु.स./प्र.स./सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. | अध्यक्ष |
| २. | उप सचिव ( पापु-१६), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. | सदस्य |
| ३. | संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर. | सदस्य |
| ४. | अवर सचिव, पापु १६, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. | सदस्य |
| ५. | कक्ष अधिकारी, कार्यासन पापु-१६, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. | सदस्य सचिव |

## समित्यांची कार्यकक्षा:-

१) राज्यस्तरीय छाननी समिती राज्य मुख्य संसाधन संस्थां निवडीबाबतच्या प्रस्तावांची छाननी करुन राज्यस्तरीय निवड समितीस शिफारस करेल.

२) जिल्हास्तरीय छाननी समिती जिल्हा मुख्य संसाधन संस्थां निवडीबाबतच्या प्रस्तावांची छाननी करुन राज्यस्तरीय निवड समितीस शिफारस करेल.

३) राज्यस्तरीय निवड समिती ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी राज्य व जिल्हा स्तरावरील मुख्य संसाधन संस्थांच्या निवडीसाठी शासनास शिफारस करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०६१५११२३९२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2019.06.06 18:23:58 +05'30'

(स्मि.स.राणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव.
३. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई.
४. उप सचिव तथा प्रकल्प संचालक,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
६. जिल्हाधिकारी (सर्व).
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
८. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर नवी मुंबई.
९. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१०. अवर सचिव पापु-१६, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई.
११. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद.
१२.संग्रहार्थ.

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या
१५०व्या जयंती निमित्त स्वच्छ भारत
अभियान (ग्रामीण) अंतर्गत कार्यक्रम
राबविण्याबाबत

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
## शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१८/प्र.क्र.५४९/पापु-१६

७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
टिळक रोड, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
तारीख: ११ जुलै, २०१९.

<u>वाचा</u> -

१) शासन पत्र क्रमांक:-स्वभामि २०१८/प्र.क्र.४८२/पापु-१६,दिनांक २३/१०/२०१८.
२) शासन पत्र क्रमांक:-स्वभामि २०१८/प्र.क्र.६३८/पापु-१६,दिनांक १३/११/२०१८
३) पाणी व स्वच्छता सहाय संस्थेचे पत्र क्रमांक:-वासो-४/मविशा/१०१८/प्र.क्र.९१/२०१८-१९/ ७६७, दिनांक १६/१०/२०१८
४) पाणी व स्वच्छता सहाय संस्थेचे पत्र क्रमांक:- वासो-४/मविशा/१०१८/प्र.क्र.९१ /२०१८-१९, दिनांक १७/११/२०१८.
५) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१८/ प्र.क्र.६३५/पापु-१६, दिनांक २०/१२/२०१८
६) शासन पत्र क्रमांक: संकिर्ण २०१८/प्र.क्र.२७६/पापु-१६,दिनांक ०५/०३/२०१९.
७) शासन पत्र क्रमांक:स्वभामि २०१८/प्र.क्र.५०२/पापु-१६,दिनांक १४/११/२०१८
८) शासन पत्र क्रमांक:स्वभामि २०१८/प्र.क्र.५०२/पापु-१६,दिनांक २९/१२/२०१८.
९) शासन पत्र क्रमांक: संकिर्ण२०१८/प्र.क्र.५०४/पापु-१६, दिनांक ०४/०२/२०१९.
१०) शासन पत्र क्रमांक: स्वभामि २०१८/प्र.क्र.५०२/पापु-१६, दिनांक ११/०२/२०१९.
११) शासन पत्र क्रमांक: संकिर्ण २०१८/प्र.क्र. ५०४/पापु-१६, दिनांक १३/०२/२०१९
१२) शासन पत्र क्रमांक: स्वभामि २०१८/प्र.क्र. ५०२/पापु-१६, दिनांक ०६/०३/२०१९
१३) शासन पत्र क्रमांक: संकिर्ण २०१८/प्र.क्र. ५०४/पापु-१६, दिनांक १२/०३/२०१९
१४) शासन पत्र क्रमांक: स्वभामि २०१८/प्र.क्र. ५०२/पापु-१६, दिनांक २९/०५/२०१९.
१५) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्रमांकःस्वभामि-२०१८/प्र.क्र.४६४/पापु-१६, दिनांक ०७/०२/२०१९

**१६) शासन पत्र क्रमांक: स्वभामि २०१८/प्र.क्र.७०१/पापु-१६,दिनांक १२/०२/२०१९**

**१७) शासन पत्र क्रमांक: स्वभामि २०१८/प्र.क्र.१७३/पापु-१६,दिनांक ०६/०२/२०१९.**

## प्रस्तावना

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची दिनांक २ ऑक्टोंबर,२०१९ रोजी १५० वी जयंती आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त त्यांना कार्यांजलीच्या माध्यमातून श्रध्दांजली अर्पण करण्याबाबत केंद्र शासनाच्या सूचना आहेत. त्याअनुषंगाने दिनांक ०२ ऑक्टोंबर,२०१८ ते ०२ ऑक्टोंबर,२०२० या कालावधीमध्ये केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) या योजनेतंर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत असून यामध्ये काही महत्वाच्या कार्यक्रमांच्या अनुषंगाने अधिक प्रगती होण्याच्या दृष्टीने सूचना देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) योजनेतंर्गत ग्रामीण शाश्वत स्वच्छतेसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भाधीन शासन आदेश / पत्रान्वये जिल्हापरिषदांना निर्देश / सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुषंगाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) योजनेतंर्गत पुढीलप्रमाणे कार्यक्रम हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून दिलेल्या कालमर्यादेमध्ये राबविण्यात यावेत.

**तक्ता "अ"**

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | शासन आदेश/पत्र | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेल्या सर्व कुटुंबांसाठी वैयक्तिक शौचालय बांधकाम करणे तसेच सर्वेक्षणातील व सर्वेक्षणातून सुटलेल्या सर्व लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान वितरीत करणे. | संदर्भाधीन क्रमांक ७ ते १४ | दिनांक ३१/०७/२०१९ पर्यंत |
| २. | एक खड्डा शौचालयाचे दोन खड्डा शौचालयामध्ये रुपांतर करणे. | संदर्भाधीन क्रमांक १ व ५ | दर दिवशी प्रत्येक तालुक्यामध्ये किमान १० |
| ३. | सार्वजनिक/सामुहिक शौचालयांचे बांधकाम करणे. | संदर्भाधीन क्रमांक १५ व १६ | दर महिन्याला प्रत्येक जिल्हयात किमान १५ |
| ४. | i) शाश्वत स्वच्छता आराखडयातून गेल्या ८ ते १० वर्षापासून वापरात असलेली २ खड्डयांची | | दिनांक ३१/०७/२०१९ पर्यंत |